अंजनगाव सुर्जी पंचायत समिती (जि. अमरावती) नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पंसई-२०१४/प्र.क्र. ११२ /बांधकाम-४
मर्झबान पथ, २५ बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: ३१ मार्च, २०१८

वाचा :-

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.,अमरावती यांचे पत्र क्र. जिप/बांध/तां-४/ २९४६/ २०१३,दि. ०५.०५.२०१४, क्र. जिप/बांध/तां-४/१४८९/२०१६, दि. ०६.०२.२०१६ व क्र. जिप/बांध /तां-३/ ७९६०/२०१७, दि. १४.१२.२०१७

प्रस्तावना :-

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी वरील पत्रान्वये अंजनगाव सुर्जी पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे.

२. अंजनगाव सुर्जी पंचायत समितीची अस्तित्वातील इमारत फार जुनी झालेली असून कार्यालयीन कामकाजाकरीता अपुरी पडत असल्यामुळे त्याठिकाणी पंचायत समितीची नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याकरीता जिल्हा परिषदेने दिनांक २१.०२.२०१३ रोजी ठराव क्र. १२ व पंचायत समितीने दिनांक २९.०३.२०१२ रोजी ठराव क्र. २ (७) पारित केला आहे. अंजनगाव सुर्जी पंचायत समिती परिसरातील शिकस्त निवासस्थाने पाडून मोजमापानुसार उपलब्ध होणाऱ्या मोकळ्या जागेमध्ये पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदर जागा मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांच्या नावे असल्याबाबत मालमत्तापत्रकाची प्रत सादर करण्यात आलेली आहे. सदर जागेवर असलेल्या शिकस्त इमारती वापरण्यासाठी योग्य नसल्यामुळे सदर इमारती पाडण्यास हरकत नसल्याचे प्रमाणपत्र अधिक्षक अभियंता (प्र.मं.ग्रा.स.यो.) अमरावती यांनी दिलेले आहे. प्रस्तावित बांधकामाकरीता जागेच्या उपलब्धतेनुसार उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सा.बां. विभाग नागपूर यांनी दिनांक २९.०७.२०१३ च्या पत्रानुसार मान्य केलेला तात्पुरता वास्तुमांडणी आराखडा (ले-आऊट) Job No. AMT २८५ DRG NO ०१ जोडला आहे. सदर वास्तुमांडणीस उपयोगकर्ता विभागाच्या सक्षम अधिकाऱ्याची मान्यता प्राप्त करुन तसेच, विद्यमान बांधकामे पाडण्याची मंजूरी प्राप्त करुन कळविल्यानंतर उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सा.बां. विभाग नागपूर यांच्याकडून अंतिम आराखडे तयार करण्यात येणार आहेत. सदर ले-आऊट मध्ये नियोजित बांधकामाकरीता Job No. GON ०७८

DRG.No- २,३,४ या नमुना नकाशावर आधारीत तळ मजला ४८५.३४ चौ.मी. + पहिला मजला ४८५.३४ चौ.मी असे एकूण ९७०.६८ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम प्रस्तावित केले असून या नकाशावर अंजनगाव सुर्जी असे नंतर लिहिल्याचे आढळून येत आहे. याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प अमरावती यांनी रक्कम रु. ५,९४,९१,९००/- इतक्या रक्कमेच्या सविस्तर अंदाजपत्रकासह प्रस्ताव सादर केला आहे. सदर अंदाजपत्रक सन २०१७-१८ च्या दरसूचीवर आधारीत असून ते उपअभियंता (बांध) दर्यापूर व कार्यकारी अभियंता (बांध) जिल्हा परिषद अमरावती यांनी साक्षांकीत केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी प्रस्तावासोबत जि.प./ पं.स.च्या ठरावाची प्रत, नमुना नकाशाची प्रत, जागेची आखीव पत्रिका, ले-आऊट प्लॅन, साईट प्लॅन, स्थळ दर्शक नकाशा, अस्तित्वातील इमारत बांधकामाचे फोटो इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या छाननीअंती अंजनगाव सुर्जी पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाकरीता एकूण रु. ४,३१,७९,०००/-किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

१. अंजनगाव सुर्जी पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम अंजनगाव सुर्जी पंचायत समिती परिसरातील शिकस्त निवासस्थाने पाडून मोजमापानुसार उपलब्ध होणाऱ्या मोकळ्या जागेमध्ये करण्याकरीता एकूण रु. ४,३१,७९,०००/- (रु. चार कोटी एकतीस लक्ष एकोणऐंशी हजार फक्त) इतक्या सविस्तर अंदाजपत्रकीय किंमतीच्या बांधकामास पुढील अटींच्या अधीन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) नियोजित अंजनगाव सुर्जी पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकामाकरीता प्रस्तावित असलेले आराखडे अंतिम करुन त्यांस उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सा.बां. विभाग नागपूर यांची मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

२) नियोजित बांधकाम करताना सदरहु बांधकामास स्थानिक नगर रचना प्राधिकरणाची तसेच, अग्निशामन यंत्रणेची मंजूरी घेणे बंधनकारक राहील.

३) नियोजित अंजनगाव सुर्जी पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकामाकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या आराखड्यात पदाधिकारी यांच्या दालनालगत महिला पदाधिकाऱ्यांसाठी प्रसाधनगृहा-सह विश्रांती कक्षाची व्यवस्था करण्यात यावी.

४) प्रस्तुत प्रशासकीय इमारत बांधकामामध्ये ग्रीन बिल्डींग संकल्पना अंमलात आणून, नैसर्गिक प्रकाशयोजना व वायुविजन, पाण्याच्या व उर्जेच्या वापरात काटकसर, पर्जन्य जलपुन:भर्रण

आणि जास्तीत जास्त पर्यावरणपूरक बांधकाम साहित्य व साधन-सामुग्रीचा वापर करणे आवश्यक राहील.

५) प्रत्यक्ष बांधकाम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६) प्रस्तुतचे काम हाती घेतल्यापासून जास्तीत जास्त दोन वर्षात पूर्ण होईल, असे नियोजन करुन, इमारत बांधकामाचा त्रैमासिक प्रगती अहवाल वेळीच शासनास पाठविण्याची संबंधित कार्यकारी अभियंता (बांध.) जिल्हा परिषद यांनी दक्षता घ्यावी.

७) या प्रकरणी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली जाणार नसल्याने, मंजूर प्रशासकीय मान्यता किंमतीतच काम पूर्ण करण्याची संबंधित कार्यकारी अभियंता (बांध.), जिल्हा परिषद यांनी दक्षता घ्यावी. या कामावर प्रशासकीय मान्यते पेक्षा अधिक खर्च झाल्यास तो पंचायत समिती / जिल्हा परिषदेने सोसावा.

८) प्रस्तुत प्रशासकीय इमारतीमध्ये अपंगांना सोयी-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने रॅम्प, रेलींग व तत्सम सुविधा निर्माण करणे बंधनकारक राहील.

२. अंजनगाव सुर्जी पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या सविस्तर अंदाजपत्रकाचा मंजूर सर्वसाधारण गोषवारा खालील प्रमाणे आहे :-

FINAL ABSTRACT FOR CONSTRUCTION OF ANJANGAON SURJI P.S. ADMIN., BLDG.		
Sr.No	**Description of item**	**Cost in Rs.**
1	Cost of work portion	29778626.00
2	Add 11% for Electrification	3275649.00
3	Add 8 % for Water Supply & Sanitation	2382290.00
4	Add 4 % Contingencies	1191145.00
5	Add 2% for Fire Fighting & Rain Water Harvesting	595573.00
6	Add 6% for Price Variation	1786718.00
7	Add 2 % for Computerization	595573.00
8	Add 12% GST	3573435.00
	TOTAL Rs	43179009.00
	SAYS Rs	**43179000.00**

३. उपरोक्त बांधकामासाठी संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर अनुदान स्वरुपात टप्प्या-टप्प्याने निधी उपलब्ध करुन दिला जाणार असून, तो उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) द्वारे वितरीत करण्यांत येईल. यावरील खर्च " २५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम १०१, पंचायती राज ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५ ००५३) " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. या कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्वरेने तांत्रिक मान्यता घेण्यात येवून त्याची प्रत शासनास सादर करावी.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पांच, अ.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०३३१२१२३२०४८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2018.04.03 12:56:48 +05'30'

(दि.बा.पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद
२) विभागीय आयुक्त अमरावती विभाग, अमरावती
३) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२, नागपूर.
४) मुख्य अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो.,कॅम्प ऑफिस, मध्यवर्ती इमारत, पुणे
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती
६) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती
७) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती
८) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद अमरावती

९) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा अमरावती
१०) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
११) उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा अमरावती विभाग, अमरावती
१२) जिल्हा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, अमरावती
१३) सभापती, पंचायत समिती, अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती
१४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती
१५) निवडनस्ती-बांधकाम-४